REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# मल्हारराव होळकर व पेशवा बाजीराव प्रथम संबंध



**डॉ. माने ए.एस**
**इतिहास विभाग प्रमुख, श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा, जि. सोलापूर.**

## प्रस्तावना:

छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. इ.स.**1674** मध्ये राज्याभिषेक करून आपल्या राज्यास सार्वभौम दर्जा प्राप्त करून दिला. इ.स.**1680** मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर निर्माण झालेली परिस्थिती, छत्रपती संभाजी महाराजांचा वध राजाराम महाराजांचा खडतर प्रवास, ताराबाईंची स्वराज्य टिकवण्यासाठी केलेली धडपड अत्यंत महत्त्वाची होती. अशातच इ.स. **1707**मध्ये औरंगजेब बादशहाचा झालेला मृत्यू व शाहूची झालेली सुटका यामुळे मराठयांच्या स्वराज्यात अंतर्गत यादवीस सुरुवात झाली.

शाहू व ताराबाई यांच्या यादवी युध्दात छत्रपतीचे स्थान स्थीर करण्यात पेशव्यांची भूमिका महत्वाची होती.

## उद्दिष्टये:

**1.** पेशवा बाजीराव प्रथम-विविध सरदार यांच्या निर्माण झालेला संबंधावर प्रकाश टाकणे
**2.** मल्हारराव होळकर यांच्या उदय व कामगिरीवर प्रकाश टाकणे
**3.** पेशवा बाजीराव व मल्हारराव यांच्यात असणाज्या संबंधाचा मराठा सत्तेवर झालेला परिणाम अभ्यासणे

## प्रस्तावना:

पेशवा बाजीराव प्रथमयाच्या काळात मराठा साम्राज्यविस्तार धोरण कोणते असावे यावरून जुने व नवे सरदार यांच्यात वाद निर्माण झाला. श्रीपतराव प्रतिनिधींच्या मते दक्षिण मोकळी करून उत्तरेचा उद्योग करावा तर बाजीरावाच्या मते मोगलशाही कमकुवत झाली असल्यामुळे फांद्या तोडत बसण्यापेक्षा बुंध्यावरच अघात करावा म्हणजे फांद्या आपोआपच गळून पडतील. हे जाणून दरबारी राजकारणात न गुंतून पडता नवीन सरदारांचा गट तयार करून आपली उत्तर भारत मोहिम पूर्ण करण्याचा प्रयत्न पेशवा बाजीराव प्रथम यांनी केला. यातुन होळकर, शिंदे , दाभाडे, गायकवाड यासारख्या सरदार घराण्याचा उदय झाला.

## मल्हारराव होळकर यांचा उदय

होळकर हे मुळचे पुण्याजवळील वाफेगावचे रहीवाशी होते. पुढील काळात फलटण परगण्यातील होळ या गावी स्थायीक झाल्यामुळे होळकर हे नाव रुढ झाले. मल्हारराव यांचा जन्म **16** मार्च **1693** रोजी झाला. वडील खंडोजी यांचा मूत्यू झाल्यामुळे आपल्या सावत्र भावास कंटाळुन आपल्या मामाकडे भोजराज बारगळ यांच्याकडे खानदेशात राहावयास गेले. तेथेच त्यं ाची लक्ष्करी शिक्षणाची सोय झाली. **1713** साली पेशवा बाळाजी विश्वनाथ यांच्या दिल्ली स्वारीवेळी

मल्हारराव होळकर व पेशवा बाजीराव यांची ओळख झाली. हि स्वारी मल्हारराव होळकर यांच्या उदयाच्या दृष्टीने खूप महत्त्वाची ठरली.

## मल्हारराव होळकर व पेशवा बाजीराव प्रथम संबंध:

औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर मुघल दरबारात मोठ्याप्रमाणात अस्थिरता वाढीस लागली. त्यातून अलम अली व निजाम यांच्यात संघर्ष निर्माण झाला. त्याची परिनिती **20** जुलै **1720** च्या बळापूर युध्दात झाली. मुघल बादशहाकडून मिळालेल्या चौथाई व सरदेशमुखी सनदाच्या बदल्यात बादशहास मदत करण्यासाठी बाजीराव समवेत मल्हारराव होळकर हजर होते. यात होळकरांनी बजावलेल्या कामगिरीवर खुश होऊन तो आपणाकडे कामास असावा असे बाजीराव प्रथम यांना वाटू लागले.

इ.स. **1721** मध्ये बापूजी प्रभु यांच्या मार्फत मल्हारराव होळकर यांनी पेशव्यांकडे नोकरीसाठी अर्ज केल्याचा उल्लेख मिळतो. वरील अर्जात कदमंबाडे व होळकर यांच्यातील निर्माण झालेल्या संघर्षाची कल्पना येते. "हल्ली त्यांचा आमचा बिघाड झाला आहे." असा उल्लेख मिळतो. **1721** मध्ये नोकरीसाठी केलेल्या अर्जात आपण इनामकुली मनापासून राजश्री केला आहे जेथे यांनी आम्हास ठेवावे. तेथे बिलकुसुर राहावे. जोध् धनी चाकरास ठेवतील त्यास इज्जतीने राहावे चाकरास हुजुर राहावे.. या पत्रावरून त्यांच्या स्वामिनीष्ठ स्वभावाची कल्पना येते. मल्हारराव प्रथम चिमाजी आप्पाकडे कामास होते. नंतर इ.स. **1725** मध्ये **500** स्वाराची मनसब देवून पेशवा बाजीराव प्रथम यांनी आपणाकडे कामास ठेवून घेतले.

## पेशवा बाजीराव प्रथम यांचे उत्तरेकडील धोरण व मल्हाराव होळकर:

पेशवा बाजीराव प्रथम यांच्या उत्तर धोरणाचा साम्राज्यविस्तार ाचा बळी प्रथम माळवा प्रांत ठरल्याचे दिसते. उत्तर भारताच्या राजकारणात सामाजिक, आर्थिक, राजकीय दृष्टया माळवा प्रांतास अनन्यसाधारण महत्व आहे. माळव्यात **32** सुभ्यांचा समावेश होता. माळवा परगण्याच्या पुर्वेकडे बुंदेलखंड, पश्चिमेकडे राजपुताना, उत्तरेकडे गुजरात आग्रा सुभे होते. उत्तरेतुन दक्षिणेकडे जाण्यासाठी माळव्यातून जावे लागत असे. पुर्वेकडून पश्चिमेकडे जाणारे अनेक व्यापारी मार्ग माळव्यातून जात असल्यामुळे माळवा अतिशय समृध्द होता. त्यामुळे माळवा प्रांतावर वर्चस्व प्रस्थापित करणे मराठयांसाठी लाभदायक होते. औरंगजेबच्या मराठा स्वराज्याच्यातील अक्रमणास शह देण्यासाठी मिळालेल्या चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा कागदावरच राहिल्या होत्या. त्या मिळविणे हा प्रमुख हेतू होता. यावेळी बेलशा येथे झालेल्या लढाईत महंमदखानचा पराभव झाला होता. यात होळकरांनी बजावलेली कामगिरी उल्लेखनिय होती. त्याचप्रमाणे शहाजपुरचा सुभेदार मीरखान याचा पराभव होळकर यांनी केला.

## भोपाळची लढाई **14** डिसेंबर **1737**

पेशवा बाजीराव यांनी दिल्ली दरबाराची विविध सरदाराचा पराभव केल्यामुळे त्याच्या विस्तारवादी धोरणास आळा घालण्यासाठी बादशहाकडून निजामास दिल्लीस येण्याचे आमंत्रण देण्यात आले. आपल्या प्रदेशाची व्यवस्था लावून **8** एप्रिल **1737** रोजी निजामाने दिल्लीकडे प्रयाण केले. जुलै **1737** रोजी निजाम दिल्लीत पोहोचला.

यावेळी मराठयांचा पराभव करण्यासाठी उत्तरेकडून निजाम व दक्षिणेकडून गाजीउद्दिन यांनी आक्रमण करावे असे नियोजन निजामाचे होते. यावेळी चिमाजी अप्पा यांनी गाजीउद्दिन यास नर्मदा पार न करू देत होळकरांनी दुर्जनसाल हाडा याचा पराभव केला. पेशवा बाजीराव यांनी सर्व बाजूंनी निजामाची कोंडी केली त्यामुळे **7** जानेवारी **1737** रोजी निजमाने सरोज या ठिकणी दुराई सरोह याठिकाणी मराठयांबरोबर करार केला. माळव्यावर मराठयांनी ताराबाईच्या काळात नेमाजी शिंदे याच्यामार्फत आक्रमण केल्याचा उल्लेख मिळतो. यास माळवा प्रदेशावर प्रशवा बाजीराव प्रथम यांच्या काळात वर्चस्व प्रस्थापित करण्यात मल्हारराव होळकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## इतर उत्तरेकडील पेशवा बाजीराव प्रथम यांच्या मोहिमा व मल्हारराव होळकर

माळवा प्रदेशावरील अंमल प्रस्थापित केल्यानंतर या बहादूर व गिरीधर बहादुर याचा पराभव करणे, माडवगड, किल्ला जिंकणे, सवाई जयसिंगाच्या कारवायास शह देणे, **8** मार्च **1730** रोजी जयसिंग याचा पराभव करून तह करण्यास भाग पाडले यावेळी सहा लक्ष रूपये खंडणी व **28** परगण्यातून चौथाई वसुल करण्याचा अधिकार मिळाला. यात होळकरांची भुमिका महत्त्वाची होती. त्यामुळे पुढील काळात मल्हारराव होळकर यांना गौतमीबाई यांच्या नावे खाजगी जागीर प्रदान करण्यात आली.

मराठयांनी याच काळात **1636** साली दिल्ली स्वारी काढली. कारण मराठयांना त्याच प्रमाणेमराठा राजपुत प्रकरणे, बुधी, जयपुर, मारवाड, प्रकरणात मल्हाराव होळकर यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. मराठा-पोर्तुगीज संघर्षात तारापूर युध्द, वसई मोहिम यात त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

## समारोप:

सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या मल्हारराव होळकरांनी **46** वर्षे मराठा राज्याची सेवा केली. त्यात **20** वर्षे पेशवा बाजीराव प्रथम यांच्या बरोबर त्यांचे संबंध**(1720-40)** प्रस्थापीत झाले होते. याकाळात त्यांनी बजावलेल्या कामगीरीमुळे मराठा राज्यास अनुकुल परिणाम झाल्याचे दिसते. या दोघामध्ये अनेक मोहिमेत संबंध प्रस्थापीत झाले. त्याचा फायदा मराठा साम्राज्यविस्तारास झाला असे म्हणता येईल.

## संदर्भ

**1.** केळकर य ना., होळकरांची कैफियत, हनुमान प्रकाशन, प्रथमावृत्ती, **1954**

**2. Grant duff, History of Maratha, Vol. II, 1922**

**3.** डॉ. यादव गुजर, मल्हारराव होळकर व त्यांचा काळ, नागपूर,**1994**

**4.** खरे ग.ह., पुरंदरे दप्तर भाग एक भारतीय इतिहास संशोधन मंडळ, पुणे, **1947**

**5.** सदरेसाई गो.स. मराठा रियासत, मध्य विभाग, भाग **-1**, दुसरी आवृत्ती, **1925**